
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 8 | APRIL - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# महात्मा फुले : शिक्षण विषयक विचार व कार्य



नील जनार्दन नागभिडे
संशोधक धाराशिव पदवी व पदव्युत्तर इतिहास विभाग
प्रा. डॉ. विष्णू बब्रुवान वाघमारे
(मार्गदर्शक) प्रोफेसर व विभाग प्रमुख श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी, सोलापूर

## घोषवारा: -

मनुवादी ब्राह्मणी व्यवस्थेने शूद्रातिशूदासह स्त्री वर्गास 'व्यक्ती' म्हणून असणारे नैसर्गीक अधिकार नाकारून त्यांच्या वाट्याला जी वंचीतता, उपेक्षा, अमानूष प्रथा, परंपरांचे ओझे लादून त्यांचे जीवन दुखकारक, अंधकारमय केले होते. या परि तीच्या कारणांचा शोध घेतला असता म. फुल्यांना या शोषणात्मक व्यवस्थेचे मूळ शूद्रातिशूदासहस्त्री समूहावर लादण्यात आलेली 'शिक्षण बंदी' वा ज्ञानग्रहन करण्याची, शिक्षण घेण्यावर जी निर्बंध लादण्यात आलेले होते त्यात आढळते. परिणामत: पेशवाईच्या अस्तानंतर ब्रिटीश राजवटीच्या माध्यमातून सर्वसामान्यांना जे शिक्षण उपलब्ध करून देण्यात आले त्या परिवर्तनाचा, बदललेल्या परि तीचा लाभ घेउन म. फुल्यांनी सन.१८४८ मध्ये मुलींच्या शिक्षणासाठी पुण्यात शाळा स्थापन करून उपेक्षितस्त्रीसमूहास शिक्षण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करून शतकोवर्षांपासून अभिजन, प्रस्थापितांच्या परिघात बंदिस्त असलेल्या ज्ञानगंगोत्रीस उपेक्षितांच्या दारात आणलेली दिसून पडते.

## महत्त्वाचे शब्द :

शोषणात्मक व्यवस्था, समता, लोकशाही, स्वातंत्र्य, शूद्रातिशूद्र, गुलामगिरी, उपेक्षा, वंचित, कष्टकरी, स्त्री शिक्षण, लोकल फंड, सावकार, व्यापारीवर्ग, भट – ब्राम्हण, मनुवादी व्यवस्था.

## उद्दिष्टे :-

- महात्मा फुल्यांच्या कालखंडातील शिक्षण विषयक परिस्थितीचा आढावा घेणे.
- महात्मा फुल्यांनी स्त्री शूद्रातिशूद्रांच्या शिक्षणाकरिता केलेले कार्य व विचारांचे विश्लेषण करणे.
- स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शिक्षण विषयक विचारविश्वात म. फुल्यांच्या विचारांचे महत्व विशद करणे.

**गृहितके:-**

- महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात महात्मा फुल्यांनी स्त्री शिक्षणाची प्रथमत: सुरूवात केलेली आहे.
- स्त्रीसह शूद्रातिशद्रांनाशिक्षण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न महात्मा फुल्यांनी केला आहे.
- म. फुल्यांच्या शिक्षण विषयक विचारात शेतकी शिक्षणासंदर्भातील पुरोगामी विचारांची मांडणी करताना दिसून येतात.

**संशोधन पध्दती:-**

म. फुल्यांचे शिक्षण विषयक विचार व कार्य या विषयावर संशोधन लेख लिहिण्याकरिता ऐतिहासिक संशोधन आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

**प्रस्तावना:-**

जागतिक मानवी इतिहासाचा ओझरता आढावा घेऊ पाहता आपणास लक्षात येते की, इतिहासाच्या प्रत्येक पुरोगामी वळणावर व्यक्ती वा व्यक्तीसमूहासधर्मसत्तेविरूद्ध बंड, उठाव करावे लागले आहे उदा. युरोपच्यामध्ययुगीन कालखंडातील सामाजिक इतिहासाच्या संदर्भात ब्रिटनमधील ऑक्सफोर्ड विद्यापिठात प्राध्यापक असलेल्या जॉन वायक्लिफने व्यक्ती व ईश्वर यांच्यामध्ये पोप, बिशप यासारख्या मध्यस्थाची गरज नाही. व्यक्तीला ईश्वरापर्यंत जाण्यासाठी संन्यासी जिवनजगने, तीर्थस्थळांना भेटी देणे किंवा धार्मिक कर्मकांड यासारख्या गोष्टींची गरज नाही, तर केवळ स्वत:च्या शुद्ध भक्ती, नामस्मरण व ईश्वरावरील श्रद्धा या आधारे तो मोक्ष मिळवू शकतो. असे सांगून त्यांनी राजसत्ता व धर्मसत्ता ह्या दोन्ही ईश्वरनिर्मीत असून लोककल्याणकारी कार्य करणे हे त्यांचे प्रमुख कर्तव्य आहे, आणि या दोन्ही संस्था जेव्हा या लोककल्याणापासूनवंचित होतील तेव्हा त्यांना सत्तेवर राहण्याचा अधिकार राहणार नाही असे निक्षून सांगितले याचा परिणाम सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धात जर्मनीतील विटेनबर्ग विद्यापिठात धर्म व तत्त्वज्ञान या विषयाचा प्राध्यापक असलेल्या मार्टीनल्यूथरनेधर्मगुरूच्या भ्रष्ट, चैनी, विलासीजीवन आणि सर्वसामान्य लोकांचे धर्माच्या नावाखाली पैशाच्या मोबदल्यात 'पाप मुक्तीपत्रका'च्या माध्यमातून पाप मुक्त होण्याची कल्पना या सर्वांवर टीकेची झोड उठवून ख्रिश्चन धर्मात सुधारणा करण्याचा प्रयत्न करणे, परिणामस्वरूपप्रोटेस्टंट पंथाची निर्मिती होणे होय.[१]ही जी प्रक्रिया युरोपाच्या इतिहासात घडली तीच प्रक्रिया एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात महात्मा फुले यांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या समाज जीवनात धर्मसत्तेच्याविरूद्ध पुरोगामी सामाजिक क्रांती घडण्याची प्रक्रिया झालेली दिसून पडते. जॉन वायक्लिफ प्रमाणे महात्मा फुल्यांनी सुद्धा 'सर्वसाक्षी जगत्पती त्याला नकोच मध्यस्थी'[२]अशी भूमिका घेऊन धार्मिक कर्मकांड, व्रतवैकल्य पुजा - अर्चा, अंधश्रद्धाना विरोध करताना दिसून पडतात. एकंदरित, प्राचीन कालखंडापासून ते आधुनिक कालखंडापर्यंतच्या समाज व्यवस्थेचे विश्लेषण करू पाहता आपणास लक्षात येते भारतातील प्राचीन समाज व्यवहार चार वर्णावर आधारित होते, प्रथमत: कार्य विभाजन गुण व कर्मावर असून नंतर ती जन्मावर आधारित झाली. वर्णव्यवस्थेतील हे परिवर्तन –लवचिकते कडून परिदृढ होणे, वर्णाचे वर्ग-जातिसंस्थेत रूपांतर करण्याची प्रक्रिया घडवून आणली आणि परिणाम स्वरूप वर्ग - जाती बाह्य व्यक्ती समूहा संदर्भात तिरस्काराची, तुच्छतेची, हिनत्वाची भावना वृध्दींगत करून स्व- वर्ग जातीबाबत अभिनिवेश, अहंमता, श्रेष्ठत्वाची भावना निर्माण होण्यास चालना दिल्याचे आढळून येते. कालौघात वरील समूहातून एका जाती समूहास वर्ग - जाती बाह्य अर्थात अस्पृश्य म्हणून गावगाड्या बाहेर, गावतटाबाहेर फेकल्या गेले. जन्मत: प्रत्येक व्यक्ती समान, स्वतंत्र असून सुध्दा काहींच्या वाट्याला समाज व्यवस्थेकडून जाणीवपूर्वक उपेक्षा, वंचितता, अवहेलना लादल्या गेली.याचा

परिणाम येथील समाजजीवनात प्रत्येक टप्प्यात क्रांती आणि प्रतिक्रांती झालेली आहे. प्राचीन वैदिक समाजजीवनात कर्मकांड, अंधश्रध्दा, यज्ञ संस्थेचे वर्चस्व होते या माध्यमातून सर्वसामान्य लोकांचे जे शोषण केल्या जात होते त्या विरोधात म. बुध्दाची समतेची बौद्ध क्रांती घडली परंतु त्याविरोधात पुढे प्रतिगामी विचारांचे समर्थन करणारी, वर्ण व्यवस्थेतील वरिष्ठ वर्ण, जातीचे श्रेष्ठत्व, विशेषाधिकाराचे समर्थन करणारी मनुवादीविचारधारेची महा प्रतिक्रांती झाली आणि शतकोवर्षे ती समाजावर प्रभुत्व प्रस्थापित केल्याचे दिसून पडते.

मध्ययुगात सर्वसामान्यांचे काही अंशी दु:खे नष्ट करणारी वारकरी संतांची अध्यात्मिक क्रांती व सर्वसामान्यांना स्वधर्म, स्वाभिमान, समानतेची, स्वातंत्र्याची वागणूक देणारी छ. शिवाजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली दक्खन प्रदेशात राजकीय क्रांती घडलेली दिसून येते परंतु छ. शिवाजी महाराजांच्या क्रांती नंतर जातिश्रेष्ठत्व-वर्चस्व, विशेषाधिकार प्रस्थापित करू पहाणारी, मनुवादी विषमता आधारित विचारधारा प्रस्थापित करू पहाणारी पेशवाईची प्रतिक्रांती झाली. तर एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात समाजातील माणसाला, माणूस म्हणून बघायला पाहिजे या फुले-शाहू-आंबेडकरी विचारधारेचीमहाक्रांती घडली.[३]बाबासाहेबांनी म. फुले, कबीर, म. बुध्द या तिघांना आपल्या आयुष्यात गुरु स्थानी मानले हे सर्वांना ज्ञात आहे, तर बाबासाहेबांनी गुरु स्थानी मानलेल्या म. फुले यांचा पुतळा महाराष्ट्राच्या विधान भवनासमोर वर्ष 1982 मध्ये उभारण्यात आला आहे. तोच पुतळा वर्ष 1925 ला पुणे नगरपालिकेत उभारला जावा यासाठी नगरपालिका सदस्य असलेल्या केशवरावजेधे यांनी प्रस्ताव मांडला होता, तेव्हा यासंदर्भातभाला'कार भोपटकरानी २०जुलै१९२५ च्या अग्रलेखात लिहीले होते, 'पुण्यातील नागरिकांची कोणती सेवा कै. जोतीरावानी केली की त्यामुळे त्यांचे सार्वजनिक स्मारक करून त्यांनी त्यांचे उतराई व्हावे? कै. जोतीराव हे 'पब्लिक' म्हणजे सावर्जनिक गृहस्थ नसून 'सेक्शनल' म्हणजे विशिष्टपंथीय होते....... जोतीरावांचा पुतळा बसविण्यास अगदी योग्य स्थळ म्हणजे पुणे शहर नसून कोल्हापूर होय.'[४] फडके य. दि.:'केशवरावजेधे' अर्थातच या सर्व विरोधाच्या परिणाम स्वरूप केशवरावजेध्यांचा प्रस्ताव नगरपालिकेतील अल्पसंख्य असलेल्या ब्राह्मण सदस्यांनी काही ब्राह्मणेतर सदस्यांच्या मदतीने फेटाळून लावला होता. थोडक्यात काय तर वर्ष 1925 ते 1982 पर्यंत महाराष्ट्रातील लोक- मानसिकतेत म. फुले स्वीकारण्या संदर्भात जे बदल वा परिवर्तन घडले ते महत्त्वाचे आहे. समाज बदलत आहे परंतु समाज बदलाची गती वा परिवर्तनाची प्रक्रिया मंद गतीने होत आहे. ती वेगाने होणे भविष्याच्या दृष्टीने व देश हिताच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार व कार्याचा संक्षिप्त आढावा घेणे हा या लेखाचा हेतू आहे.

## महात्मा फुले : शिक्षणविषयक विचार

एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात पेशवाईचा शेवट होऊन तत्कालीन मराठी भाषिक प्रदेशात म्हणजेच महाराष्ट्रात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची राजवट सुरू झाली होती, या ब्रिटिशराजवटीसोबत नवे ज्ञान, बुध्दिप्रामाण्यवाद, तर्काधिष्ठितविचार व यंत्रयुगाचा प्रारंभ होऊन येथील पुराणमतवादी, मनुवादी प्रथा, परंपरा, पोथीनिष्ठा, कर्मकांड यांचे तर्काधारित बुद्धीप्रामाण्य विज्ञानवादी विचारांच्या प्रकाशात परिक्षण करण्याचा प्रवाह ब्रिटिश राजवटीत अस्तित्वात आल्याचे लक्षात येते. या जुनाट मनुवादीविचारांच्या आधारावर जी सामाजिकमूल्ये म्हणून घोषीत करण्यात आलेली होती त्याआधारे मानवी कर्तृत्व दास्यश्रृंखलांनीबंदिस्त करण्यात आलेली होती, ती मूल्येसमाजहितकारक आहेत का? असा प्रश्न विचारला जाऊ लागला. तत्कालीन कालखंडात ब्रिटिश सत्ताधारी वर्गाने प्रशासकीय गरजेतून एतदेशीयांना आधुनिक शिक्षण देण्याचे प्रारंभ केले हे बदल

नि तच टिशपूर्व महाराष्ट्रातील परि तीपेक्षा अधिक पटीने शूद्रातिशूद्रांवर दूरगामी परिणाम करणारे होते असे महात्मा फुल्यांची धारणा होती. कारण येथील मनुवादी विचारा नेस्त्रीशूद्रातिशूद्रांवर शिक्षण घेण्यावर कायद्याने बंदी घातलेली होती. तेव्हा सर्वांसाठी शिक्षण उपलब्ध करण्याची ब्रिटिशांचीभूमीका महात्मा फुल्यांना समर्थनीय वाटत होते, या पार्श्वभूमीवर त्यांनी पुढील शिक्षणविषयक विचार व कार्य केलेले दृष्टिस येते.

## स्त्री शिक्षणविषयक कार्य :-

हिंदूधर्मीय स्मृतीकार व धर्मग्रंथांनी स्त्री वर्गाला शूद्रातिशूद्रांच्या दावणीला बांधून त्यांना शिक्षणापासून जाणिवपूर्वक वंचित ठेविले होते एवढेच नव्हे तर स्त्रीवर्गावर अनेक सामाजिक बंधने लादण्यात आलेली होती. उदा, 'स्त्री ही लहान असताना वडीलाच्या संरक्षणात, तारूण्यातपतिच्याआणि वृद्धापकाळी मुलाच्या संरक्षणात असावे.' याचाच अर्थ स्त्री ही स्वातंत्र्यास अपात्र आहे, ही व यासारख्या अनेक बंधणे स्त्री समूहावर प्रतिगामीविचारांच्या समाजमनाने लादलेली होती. या सर्व बंधनातून स्त्री वर्गास बंधमुक्त करण्याचा मार्ग हे केवळ शिक्षणाच्या माध्यमातूनच जाऊ शकतो या भूमिकेतून महात्मा फुल्यांनी सन.१८४८ ला पुण्यात बुधवार पेठेतील भिडेवाड्यात शूद्रवर्गातील मुलींसाठी शाळा सुरू केली. १७ सप्टेंबर १८५१ ला रास्ता पेठेत मुलींची दुसरी शाळा काढली आणि१५ मार्च १८५२ रोजी वेताळ पेठेत मुलींची तिसरी शाळा काढलेली दिसून पडते.[५]स्त्री शिक्षणविषयक कार्यातील महात्मा फुल्यांचे त्याग आणि कष्ट याची फलश्रुति म्हणजे ब्रिटीश शासनाकडून त्यांच्या गौरवार्थविश्रामबाग वाड्यात १६ नोव्हेंबर १८५२ सरदार व प्रमुख लोकांची सभा आयोजित करण्यात येऊन त्यांचा सत्कार करण्यात आला होता.

## महात्मा फुले : शिक्षणाचा 'झिरपण्याचा सिद्धांत' विषयकभूमभिका:-

म. फुलेपूर्व महाराष्ट्रात आधुनिक दृष्टीकोनातून आज आपण ज्यास शिक्षण म्हणतो ती शिक्षणाची व्यवस्था अस्तित्वात नव्हती, शास्त्री, पंतोजी खाजगी शाळा काढीत मुळात ती पंतोजीच्या घरी वा एखाद्या देउळ, मंदिरात ब्राह्मणाच्या मुलांना संस्कृत, व्याकरण, ज्योतिष व धर्मशास्त्रावरिल ग्रंथाचे पाठांतर याआधारावरचे शिक्षणाची व्यवस्था अस्तित्वात होती. एखाद्यावेळी जमीनदार आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी खाजगीरित्यापंतोजीची नेमणूक करून आपल्या मुलासोबत गावातील दोन – चार मुलांना व्यवहार उपयोगी अंकगणित, मोडी लभिपीचा अभ्यास मंदिरात करून घेण्याची व्यवस्था केली जात असे. अर्थात कनभिष्ठ वर्गातील म्हणजेच शूद्रातिशूद्रांनाशिक्षण देण्याची गरज नाही किंवा शूद्रातिशूद्रांनाशिक्षण घेण्याचा हक्क नाही अशी समाजधारणा होती. अशी परि ती असताना सन. १८१३ च्या चार्टर ॲक्टन्वये 'भारतातील शिलकीमहसूलापैकी प्रत्येक वर्षी कमीत कमी एक लक्ष रूपयांची रक्कम वेगळी काढावी. तिचा उपयोग भारतातील प्राच्य वाड्.मयाचेपुनरूज्जीवन नी वृद्धी करण्यासाठी तसेच पंडितांना उत्तेजन देण्यासाठी आणि भारतातील रहिवाश्यांमध्ये शास्त्रांचे ज्ञान सुरू करून त्याच्या प्रसारासाठी करण्यात यावा',[६]अशाप्रकारे भारतात प्रथमच 'शिक्षण' याविषयाच्या प्रसार व प्रचाराची जबाबदारी शासनसंस्थेवर कायद्याच्या माध्यमातून बंधनकारक करण्यात येउनशिक्षण हे सर्वांसाठी खूले करण्यात आले होते. त्यानंतर थोड्याच कालाखंडानंतर शिक्षणविषयक एका वादाचा उद्भव झाला तो म्हणजे काही ब्रिटिशअधिकारी वर्गासएतदेशीयांना पाश्चात्य शिक्षण इंग्रजी भाषेच्या माध्यमातून देण्यात यावा असे वाटत होते तर काही ब्रिटिशविचारवंत व प्रशासकीय अधिकारी वर्गास एतदेशीयांना पौर्वात्य शिक्षण त्यांना त्यांच्याच भाषेत दिला जावा असे वाटत होते या वादाचा शेवट लॉर्ड बेंटिगच्या कार्यकारी मंडळातील विधी मंत्री व शासकीय शिक्षणसमभिचीचे अध्यक्ष असलेले लॉर्ड मेकॉले यांनी एतदेशीयांना पाश्चात्य शिक्षण इंग्रजी

माध्यमातून देण्यात यावा असे धोरण जाहीर करण्यात आले. परंतू असे करताना शिक्षणप्रथमत: भारतातील अभभिजन वर्गास देण्यात यावा आणि हा शिक्षणाचालाभार्थी असलेला प्रस्थापभितअभभिजन वर्ग नंतर आपल्या खालील कनभिष्ठ वर्गातील लोकांमध्ये या शिक्षणाचा प्रसार करेल असा हा 'झभिरपण्याचासिद्धांताची' मांडणी करण्यात आली होती, या विचारसरणीचा महात्मा फुल्यांनी विरोध केलेला दिसून पडतो कारण ब्राह्मणी धर्म शूद्रातिशूद्र वर्गातील लोकांचा स्पर्शसूद्धाविटाळ मानला जातो तेव्हा या प्रस्थापभितअभभिजन वर्गाकडून या बहूजन वर्गासाठी शिक्षण उपलब्ध करून देण्याचे कार्य होईल याची अपेक्षा फुल्यांनी नव्हती, एकंदरित म. फुले शिक्षणविषयक 'झभिरपण्याचासिद्धांत' यास विरोध करताना दिसून येतात.

## म. फुल्यांचे शेतकरी वर्गातील मुलांच्या शिक्षणाविषयी विचार

ब्रिटिश व्यवस्था आणि पेशवाई यामध्ये मूलभूत फरक आढळून येते ते म्हणजे ब्रिटिशांनी प्रारंभ केलेली आधुनिक शिक्षण पद्धत ही होय. त्याआधी शिक्षण हे केवळ मुठभरांच्या मुठीत बंदिस्त होते व ते मुलत: मठ, पीठ, मंदिराच्या माध्यमातून उपलब्ध होते. मुळात मठ, पीठ, मंदिरात बहूजन समाजास प्रवेशच बंदी होती तर शिक्षण उपलब्ध करणे ही तर अशक्यप्राय गोष्ट होती. एकंदरीत, ब्रिटिश राजवटीत बहूजन वर्गास शिक्षण उपलब्ध करून दिल्याबाबत फुल्यांना कौतुक होते. फुल्यांना बहूजन समाजा संदर्भात शिक्षणाचे महत्त्व काय आहे, हे त्यांच्या 'शेतकऱ्याचा असूड' मधील उपोदघात – 'विद्येविना मति गेली.........इतके अनर्थ एका अविद्येने केले'[७] या शब्दावरून लक्षात येते. त्यांना शूद्रादिअतिशूद्र शेतकरी वर्गातील मुलांनी शिक्षण घ्यावे असे वाटत होते व शासन संस्थेनी यासाठी पुढाकार घ्यावा परंतु शासन संस्थेच्या माध्यमातून जो शिक्षणाकरिता 'लोकल फंड' गोळा केल्या जात होता त्याचा वापर पुरेशा प्रमाणात शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शाळा स्थापण करण्यात केला जात नव्हता. जे शाळा स्थापण केल्या गेले तेथील शिक्षक ब्राम्हण असल्याने व शेतकरी वर्गाविषयी पूर्वग्रह असल्याने या शाळेतील शेतकरी मुलांना हिन दर्जाची वागणूक दिली जात. त्यामुळे शिक्षण घेण्याचे धाडस कुणी करीत नव्हते. लोकलफंडाचा वापर शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण घेऊन नोकरी मिळवण्यासाठी किती प्रमाणात झाला असा सवाल म. फुले करतात ......

"साऱ्यासह फंड शूद्र किती देती ॥धूर्त आर्य खाती, शाळा खाती॥१॥,
शूद्रादीक त्यांनी किती शिकविले॥ कामगार केले, दावा आम्हा॥२॥.....
शूद्रादी थकले फंड देता देता॥ भटास पोशीता, जोती म्हणे."॥४॥[८]

शिक्षण संदर्भातील या दुष्ट चक्रातून बाहेर पडण्यासाठी व शेतकऱ्यांच्या मुलांनी शिक्षण घेण्यासाठी शेतकरी वर्गामधूनच शिक्षक तयार केला जावा. असा शिक्षक शूद्रादिअतिशूद्र विद्यार्थ्यांशी समरस होऊन त्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न करेल असा सल्ला ते इंग्रजांना देतात...........

"शूद्र शिक्षक ते सरकार मागा॥ आर्याजीस सांगा, दान मागा॥
शूद्र मुली-मुला शाळेत घालावे॥ सुशील करावे सर्व कामे॥"[९]

यावरून त्यांची शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण देण्याबाबतची तळमळ लक्षात येते.

## नभिष्कर्ष:-

महात्मा फुले यांनी शूद्रातिशूद्रासह स्त्री वर्गास शिक्षणापासूनवंचित ठेवून शोषणात्मक व्यवस्थेची तटबंदी कशी अभेद राहणार याची शतकोवर्षांपासून प्रयत्नरत असणाऱ्या मनुवादी ब्राह्मणी व्यवस्थेचा बुरूज समग्र वैचारिक बंड, क्रांतीच्या माध्यमातून प्रथमत: नष्ट करण्याचा प्रयत्न एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आपल्या प्रत्यक्ष शिक्षणविषयक कार्य आणि वैचारिक ग्रंथामधिल लेखणातून केलेले आढळते. त्यांनी विषमताधिष्ठीत समाजरचना नष्ट करून समताधिष्ठित समाज रचनानभिर्माण करण्यासाठी प्रथमत: शतकोवर्षांपासून जाणीवपूर्वक उपेक्षित, वंचभित ठेवण्यात आलेल्या वर्गसमूहास जर शिक्षण उपलब्ध करून देण्यात आले तर त्या समूहास धर्माच्या आधारे व विभभिन्नप्रतिगामी रूढी, प्रथा, परंपरांच्या माध्यमातून त्यांचे केल्याजाणाऱ्या शोषणाचे वास्तव स्वरूप लक्षात येउन, त्यांच्या मध्ये या शोषणात्मक व्यवस्थेविरोधात आत्मभानयेउनया विरोधात तो बंड, उठाव केल्याशिवाय राहणार नाही याची जाणीव म. फुल्यांना होती म्हणूनच त्यांनी एखाद्यावेळी उच्च शिक्षणावर केला जाणारा खर्च कमी करून ग्रामीण भागातील शूद्रातिशूद्रासह स्त्री वर्गास सक्तीच्या प्राथमभिक शिक्षणाची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात यावी अशी भूमिका घेताना दिसून पडतात.

## संदर्भ सूची:-


१. Hans Raj: 'Western world-mid 15TH century to world war II

२. कीर धनंजय, मालशे. स.गं. (संपादक): 'महात्मा फुले: समग्र वाड्.मय - 'अखंडादी काव्यरचना',आवृ. तिसरी, महाराष्ट्र राज्य साहभित्यआणि संस्कृती मंडळ, मुंबई,१९८८,

३. वैद्य प्रभाकर: 'महात्मा फुले आणि त्यांची परंपरा', लोकवाड्.मय गृह, मुंबई,२०१६

४. फडके य. दि. : 'केशवरावजेधे', श्रीविद्या, पुणे, १९८२, पृ. ६१

५. हरि नरके, फडके य. दि. : 'महात्मा फुले गौरव ग्रंथ', खंड प्रथम, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समभिती महाराष्ट्र राज्य शिक्षणविभाग, मुंबई,१९९१,पृ. १३३

६. तत्रैव पृ.१२२

७. उपरोक्त क्र.२, पृ. २०३.

८. उपरोक्त क्र.२, पृ. ५०१.

९. उपरोक्त क्र.२, पृ. ५०२.

१०. दीक्षित राजा: 'एकोणिसाव्या शतकातील मध्यमवर्गाचा उदय', डायमंड बुक डेपो, पुणे.

११. कीर धनंजय: 'महात्मा जोतीराव फुले', पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई,२०१७.

१२. पंडितनलभिनी: 'आंबेडकर', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई,२००५.